## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जळगाव

### कंत्राटी पद्धतीने विविध पदभरतीसाठी जाहिरात 2018

**जाहिरात क्रमांक - 1/2018**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जळगाव मार्फत इंटेन्सीव्ह तालुक्यात स्वयंसहाय्यता समुहाची स्थापना, सक्षमीकरण, बळकटीकरण, संगोपन, क्षमताबांधणी इ. कामे करण्यासाठी कंत्राटी पद्धतीने 11 महिन्यांच्या कालावधीकरीता जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) व सहाय्यक कर्मचा-यांची रिक्त असलेली पदे भरण्याकरीता अर्हताप्राप्त उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.jalgaondrdaexam.com या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर पदे केवळ मानधनी व कंत्राटी असल्यामुळे कधीच शासकिय सेवेमध्ये कायम करण्यात येणार नाहीत.

**संवर्ग निहाय रिक्त पदांची संख्याः-** प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) - 58, लेखापाल (Accountant) - 1, प्रशासन सहाय्यक (Admin Assistant) -1., प्रशासन व लेखा सहाय्यक (Admin & Account Assistant) - 15, डेटा एन्ट्री ऑपरेटर (Data Entry Operator) - 16, शिपाई (Peon) - 16

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 27/09/2018 रोजी दुपारी 12.00 पासून | दिनांक 11/10/2018 सायंकाळी 05.30 पर्यंत |

**बँकेत रोखीने किंवा ऑनलाईन पद्धतीने परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक** 13/10/2018

कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात www.jalgaondrdaexam.com व www.zpjalgaon.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे तसेच शैक्षणिक व अनुभव निकषांत बदल करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. तथा जिल्हा अभियान संचालक, जळगाव यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

जिल्हा अभियान संचालक
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा जळगाव